# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २६ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## इंडिया आघाडीत ठिणग्या! काँग्रेसला बाहेर काढण्याच्या हालचाली? 'आप'च्या भूमिकेने खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र लढत असलेल्या काँग्रेस आणि आम आदमी पक्षातील वादाचे हादरे इंडिया आघाडीला बसताना दिसत आहे. त्यामुळे विरोधकांच्या एकजुटीला तडा जातो की काय अशीही चर्चाही सुरू झाली आहे. कारण काँग्रेसला इंडिया आघाडीतून बाहेर काढण्याच्या हालचाली आपने सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली. काँग्रेसने अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात तक्रार दाखल केल्यामुळे आम आदमी पक्ष नाराज झाला असून, आता काँग्रेसला इंडिया



आघाडीतून बाहेर काढण्याची भूमिका घेतली आहे.

विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच दिल्लीतील राजकारणाचा पारा वाढला आहे. काँग्रेसचे नेते अजय माकन यांनी आपचेअरविंद केजरीवाल आणि मुख्यमंत्री आतिशी यांच्यावर गंभीर आरोप करत तक्रार केल्याने आप नाराज झाली आहे.

अरविंद केजरीवालांना देशविरोधी म्हणत, ते अस्तित्वात नसलेल्या योजनांवरून लोकांची दिशाभूल आणि फसवणूक करत असल्याचा आरोप काँग्रेसच्या नेत्यांनी केला. काँग्रेसने अशा पद्धतीने हल्ला चढवल्याने आम आदमी पक्षाचे नेतेही आक्रमक झाले आहेत.

आपचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी पत्रकार परिषद घेत काँग्रेस नेते अजय माकन आणि माजी खासदार संदीप दीक्षित यांच्यावर हल्ला चढवला. मुख्यमंत्री आतिश यांच्यासोबत घेतलेल्या परिषदेत खासदार सिंह म्हणाले, अरविंद केजरीवाल यांना देशविरोधी म्हणणाऱ्या अजय माकन यांच्यावर काँग्रेसने २४ तासात कारवाई करावी. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला मदत करण्यासाठी काँग्रेस सर्व काही करत आहे, असा गंभीर आरोप सिंह यांनी केला. काँग्रेसचे अजय माकन हे भाजपची स्क्रिप्ट वाचत आहेत. काँग्रेसने अजय माकन यांच्याविरोधात कारवाई केली नाही, तर काँग्रेसला इंडिया आघाडीतून काढून टाकावे, अशी मागणी आम आदमी पार्टी आघाडीतील घटक पक्षाकडे करणार आहे, असे खासदार सिंह म्हणाले.

**इंडिया आघाडीचं नेतृत्व बदलण्याच्या चर्चा**

महाराष्ट्र आणि हरयाणात काँग्रेसचा मानहानीकारक पराभव झाल्यापासून इंडिया आघाडीचे नेतृत्व बदलण्याची मागणी होत आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी नेतृत्व करण्याची तयारी दर्शवली आहे. दुसरीकडे लालू प्रसाद यादव यांनीही ममतांना पाठिंबा दिला आहे. आता आम आदमी पक्षाने काँग्रेसला थेट इंडिया आघाडीतून बाहेर काढण्याची भूमिका घेतल्याने विरोधकांच्या एकजुटीबद्दलच्या चर्चेने डोकं वर काढलं आहे.

## ईव्हीएम प्रकरणी सुप्रिया सुळेंची वेगळी भूमिका

### युगेंद्र पवारांना फेरमतमोजणीचा अर्ज मागे घ्यायला सांगितला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ बारामती**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. या निकालावरुन विरोधकांनी ईव्हीएममध्ये फेरफार झाल्याचा आरोप करण्यात आला होता. राज्यातील अनेक उमेदवारांनी फेर मतमोजणीची मागणी केली होती. याबाबत काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने आरोप केले होते. दरम्यान, आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी याउलट भूमिका घेतल्याचे दिसत आहे. 'आपण ठोस माहितीशिवाय ईव्हीएमला दोष देणार नाही', अशी प्रतिक्रिया दिली आहे. तर दुसरीकडे युगेंद्र पवार यांना फेर मतमोजणीचा अर्ज मागे घेण्यास सांगितल्याचे त्यांनी सांगितले.



काल पुण्यात पत्रकारांसोबत संवाद साधताना त्यांनी हे विधान केले. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, युगेंद्र पवार यांना तो अर्ज मागे घेण्यासाठी मीच सांगितलं. मला असं वाटत होत की, बाकीच्या बऱ्याच जणांनी हे केलं आहे. बाकीच्या ठिकाणची माहिती घेत आहे. गडबड अशी काही नाही, युगेंद्रचा हा पहिलाच अनुभव आहे. वयानेही तो लहान आहे, मोठा संघर्ष त्याने अेक महिने केला आहे, असंही सुप्रिया सुळे म्हणाले.सुप्रिया सुळे म्हणाल्या, ईव्हीएममध्ये फेरफार झाल्याचे ठोस पुरावे हाती आल्याशिवाय त्याबाबत मी दोष देणे योग्य नाही. मी याच ईव्हीएमवर चार निवडणुका जिंकली आहे. ईव्हीएम मशीन आणि मतदार यादीतील घोळामुळे संशयास्पद वातावरण निर्माण झाले आहे. या सर्वांचा अभ्यास केला पाहिजे, या मुद्द्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## भीमाशंकरमध्ये घुमला 'ओम नमः शिवाय'चा जयघोष; नाताळ सुट्टीनिमित्त २ लाख भाविकांनी घेतले शिवलिंगाचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६भीमाशंकर**

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे नाताळनिमित्त 'ओम नमः शिवाय'च्या जयघोषात दोन लाख भाविकांनी बोचरी थंडी व ढगाळ वातावरणात पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेत पर्यटनाचा आनंद लुटला. परंतु, प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे येणाऱ्या भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

बुधवारी (दि.२५) रात्रीपासूनच श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे नाताळनिमित्त मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी झाली होती. या गर्दीमुळे दर्शनरांग मुख्य महाद्वारापर्यंत येऊन पोहोचली होती. मंगळवारी सकाळी आठपासूनच गर्दी झाली होती. पुणे, मुंबई, अहिल्यानगर, नाशिकसह परराज्यातील भाविकही मोठ्या संख्येने आले होते. वाहतूक मंचर– भीमाशंकर तसेच मंदोशी मार्गे सुरू आहे. भीमाशंकरकडे येताना पोखरी घाटातून डिंभे धरणाचे मनोहारी दृश्य नजरेस पडत असल्याने येथेही मोठ्या संख्येने पर्यटक थांबत आहेत.

खेड-आंबेगाव तालुक्याच्या सीमेवर बारा ज्योतिर्लिंगापैकी सहावे व पुणे जिल्ह्यातील एकमेव ज्योतिर्लिंग श्रीक्षेत्र भीमाशंकरला १९८५ मध्ये सरकारने १३० चौरस किलोमीटर परिसर अभयारण्य म्हणून जाहीर केला आहे. या परिसराच्या सौंदर्याची ओळख मानवी मनाला भुरळ घालते. अभयारण्य परिसरात प्रवेश



केल्यानंतर रस्त्याच्या दुतर्फा दिसणारे घनदाट जंगल असून, या घनदाट जंगलातून येणारे किडे, पक्षी व प्राणी यांचे आवाज हृदयाचे ठोके वाढवल्याशिवाय राहत नाही. भव्यदिव्य हेमाडपंती शिवमंदिर पाहिल्यानंतर भक्त शिवलिंगाच्या दर्शनासाठी अधीर होऊन जातात.

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे वाहनतळ नसल्यामुळे तसेच पुढे वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी श्रीक्षेत्र भीमाशंकरच्या अलीकडेच तीन ते चार किलोमीटरवर पोलिस प्रशासनाकडून वाहने थांबविण्यात येत होती. म्हातारबाचीवाडी येथे वनविभागाच्या चेकपोस्ट येथे कर वसुलीसाठी वाहने थांबत असल्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्यामुळे वाहनांची रांग ही एक ते दीड किलोमीटरपर्यंत येऊन पोहोचली होती. गर्दीच्या दिवशी हा नाका बंद करण्यात यावा किंवा कर्मचारी संख्येत वाढ करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांसह भाविकांनी केली. भीमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांना मंदिर परिसरामध्ये व्यवस्थित दर्शन व्हावे, यासाठी उपकार्यकारी विश्वस्त मधुकरशास्त्री गवांदे, विश्वस्त दत्ताभाऊ कौदरे, गोरक्ष कौदरे, व्यवस्थापक चंद्रकांत कौदरे प्रयत्न करत होते. तर वाहनतळाचे नियोजन तसेच मुख्य रस्त्यावर कुठेही वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी घोडेगाव पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक किरण भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस फौजदार शिवाजी केंगले, पोलिस हवालदार तेजस इष्टे, रमेश काठे, गणेश गवारी, पोलिस जवान इंद्रजित वाळुंज, भाऊ कोरके, राठोड हे नियोजन करत होते.

## धनंजय मुंडेंवर फडणवीस आणि अजित पवारांचा वरदहस्त : संजय राऊत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड सूत्रधार असल्याचा आरोप सध्या केला जातोय. ते अजित पवार गटाचे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे मुंडेवर देखील विरोधक तुटून पडले आहेत. आता या प्रकरणी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत ( यांनी देखील वक्तव्य केलंय. धनंजय मुंडे यांच्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा वरदहस्त असल्याचं राऊतांनी म्हटलं आहे.

माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, कल्याण, अंबरनाथ हा मुख्यमंत्र्यांच्यचा चिरंजीवांचा जिल्हा आणि मतदारसंघ आहे. या जिल्ह्यात लुटमार, बलात्कार वाढले आहेत. गुंडाना अभय दिलं जातंय. खासदार मतदारसंघात फिरकत देखील नसल्याचा आरोप संजय राऊत यांनी केलाय. ही घटना अक्षय शिंदे प्रकरणानंतर झालेली अतिशय धक्कादायक घटना आहे. बलात्कार, खून करणारी लोक ही बीड आणि कल्याणमध्ये का असतात? देवेंद्र फडणवीस आणि ते खासदार गप्प का? असा सवाल देखील राऊतांनी केलाय.

बीडमधील चित्र वाईट आहे. उद्धव ठाकरे लवकरच बीड आणि परभणी या ठिकाणी जातील. बिहारचं चित्र कल्याण आणि अंबरनाथमध्ये दिसतंय. मी एक व्हिडीओ सोशल मीडियाच्या माध्यमातून लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवला आहे. त्यांना अर्बन नक्षलवादची फार चिंता आहे.



बीडमध्ये कोण तुमचे जावई की मुलं आहेत? बीडमध्ये वर्षाभरात ३८ हत्या झालेल्या आहेत. बीडमधील नक्षलवाद संपवा. बीडमधे अर्बन नक्षलवाद आहे. याला देवेंद्र फडणवीस आणि आरएसएसचा पाठिंबा आहे का? असा सवाल देखील त्यांनी केलाय.

संजय राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस तुम्ही खोटं बोलणं थांबवा. तुम्हाला मुख्यमंत्री आणि गृहमंत्री पद मिळाले आहे, ते विरोधकांना संपविण्यासाठी नाही तर जनतेच संरक्षण करा. लाडक्या बहिणींचं संरक्षण करा. त्या लाडक्या बहिणींच कुंकू पुसलं गेलेलं आहे, असे मंत्री तुमच्या मंत्रीमंडळात बसलेले आहे अशी टीका देखील त्यांनी केलीय.

बीडमधील पिस्तुल लायसन्स रद्द करा, अशी मागणी देखील यावेळी संजय राऊत यांनी केलीय. १५०० लायसन्स आहेत, ते सर्व बिहार मधून आणलेले आहेत. दोन जिल्हे महाराष्ट्राला बदनाम करत आहेत. ३८ महिलांचं कुंकु त्यांनी पुसलंय. आमची माहिती सर्व तुमच्याकडे असते. तुम्ही वेशांतर करता तर मग बीडमध्ये वेशांतर करुन जा. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा वरदहस्त आहे. गुन्हे खपवून घेणार नाही असं म्हणता, मग तुमचे हे जावई आहेत का? असा सवाल देखील राऊतांनी केलाय.

## १०० दिवसांच्या आराखड्यातून ठोस कामगिरी करा मुख्यमंत्री फडणवीसांचे कर्मचाऱ्यांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ मुंबई**

राज्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी पुढील १०० दिवसांचा आराखडा विभाग तयार करीत आहेत. या आराखड्यात लोक केंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगाने सहजतेने नागरिकांना लाभ मिळणाऱ्या योजना, राज्याचे पुढारलेपण कायम ठेवत प्रगतीच्या शिखरावर नेणाऱ्या कामगिरीचा समावेश असावा, असे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढील १०० दिवसांच्या आराखड्यातून विभागांनी ठोस कामगिरी करण्याच्या सूचना दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे उच्च व तंत्र शिक्षण, वन व कृषि विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, कृषि विभागाच्या सचिव जयश्री भोज, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, वित्त विभागाच्या सचिव शैला ए आदी उपस्थित होते.

वन्य प्राणी व मानवी संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता व माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगातून उपाययोजना करण्याच्या सूचना करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मानव व वन्य प्राणी संघर्षामध्ये जलद गतीने मदत मिळण्यासाठी जलद बचाव दलाची स्थापना करण्यात यावी. या दलातील मनुष्यबळाला उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात यावे. पुढील १०० दिवसांच्या



आराखड्यात अशा उपाययोजनांचा समावेश वन विभागाने करावा. वृक्षलागवडीचा संस्कार रूजण्यासाठी ती कायम स्वरूपी अंमलात आणावी. या आराखड्याच्या माध्यमातून लोकांचे जीवन सुसह्य होण्यासाठी काम करण्यात यावे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता त्यांना अन्य राज्यातील अभयारण्यात गरजेप्रमाणे देण्याची व्यवस्था करावी. बिबटे निवारा केंद्रांची क्षमता वाढविण्यात यावी. विभागाने कार्बन क्रेडीट कंपनी स्थापन करण्याबाबत धोरण आणावे. शहरी भागातील वनीकरण वाढविण्यासाठी मियावॉकी वृक्षलागवड पद्धत शहरांमध्ये उपयोगात आणावी.

कृषि विभागाने आपल्या आराखड्यातून शेतकरी केंद्रबिंदू ठेवत योजनांची अंमलबजावणी करावी. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने देशात येणाऱ्या परदेशी विद्यापीठांना आकर्षित करून शैक्षणिक संकुल निर्माण करावे. यावेळी बैठकीला संबंधित विभगांचे अधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय ......

# एका अध्यायाला पूर्णविराम

*भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचे निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. श्याम बेनेगल हे बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीची न भरून येणारी हानी झाली आहे. बेनेगल यांना भारत सरकारने १९७६ मध्ये पद्मश्री आणि १९९१ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते. श्याम बेनेगल हे चित्रपटसृष्टीतील दिग्गज दिग्दर्शक होते. त्यांनी अनेक गाजलेल्या मालिका टेलिव्हिजनला दिल्या. बेनेगल यांना भारत सरकारने १९७६ ते १९९१ सालामध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते. आपल्या वेगळ्या धाटणीच्या दिग्दर्शनासाठी ओळखल्या गेलेल्या श्याम बेनेगल यांची ओळख काही भारतापुरती सीमित नाही, तर जगभरातील विविध मानाच्या चित्रपट महोत्सवांमध्ये त्यांचे चित्रपट दाखवले गेले आहेत. दादासाहेब फाळके यांनी भारतामध्ये सिनेमांची मुहुर्तमेढ रोवली आणि भारतीय चित्रपटांचा प्रवास सुरू झाला. सुरुवातीला आध्यात्मिक आणि मनोरंजनावर आधारित चित्रपटांचा प्रवास सुरू झाला. यानंतर काही स्वातंत्र्य चळवळीला चालना देणारे आणि सामाजिक वास्तव दाखविणारे सिनेमेही येऊ लागले. पण पुढे चित्रपटामध्ये मुख्यत्वे मनोरंजन हा एकच बाज कायम राहिला आणि प्रेक्षकांनीही त्याला डोक्यावर घेतले. पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात सामाजिक भान देणारी आणि वास्तववादी चित्रपटे येत होती. सत्यजीत रे, बिमल रॉय, व्ही. शांताराम, गुरु दत्त, कैफी आजमी, बलराज सहानी या सारख्या दिग्दर्शक आणि कलाकारांनी आपल्या चित्रपटांतून समाजाचे वास्तव समोर आणणे चालू ठेवले होते, पण यानंतर ७०-८० च्या दशकात शाम बेनेगलसारखा तरुण दिग्दर्शक येऊन अशा सामाजिक चित्रपटांना नवा आयाम देत समांतर चित्रपटांची चळवळच सुरू केली.*

*मनोरंजनावर आधारलेल्या प्रस्तापित सिनेमांना छेद देत बेनेगल यांनी समांतर चित्रपटांच्या युगास प्रारंभ केला. भारतामध्ये ज्या दिग्दर्शकांनी समांतर चित्रपटाची चळवळ सुरू केली त्यामध्ये श्याम बेनेगल यांचे नाव आघाडीने घ्यावे लागेल. चित्रपट हाच ध्यास आणि चित्रपट हाच श्वास या ध्येयाने श्याम बेनेगल यांनी या क्षेत्रामध्ये आपल्या नावाचा वेगळा ठसा उमटविला. सुरुवातीला शाम बेनेगल यांची उसकी रोटी, भुवन शोम, सारा आकाश या सारखी चित्रपटे आली होती. पण, 'अंकुर' हा चित्रपट माईल स्टोन ठरला आणि समांतर चित्रपटांची मुहुर्तमेढ रोवली गेली. या समांतर चित्रपटांमध्ये कोणी निर्माता पैसे गुंतविण्यास तयार होत नसत. म्हणून असे चित्रपट बनविण्यासाठी राष्ट्रीय चित्रपट फायनान्स महामंडळाकडे जावे लागे. आता सरकार चित्रपट बनविण्यासाठी पैसे देणार म्हटल्यावर त्यामध्ये हस्तक्षेपही आलाच. म्हणून शाम बेनेगल यांनी आपले चित्रपट स्वत: बनविण्यासाठी जाहिरात संस्था काढली. जाहिरात बनवून आलेला पैसा ते चित्रपटांमध्ये गुंतवत असत. 'अंकूर', 'निशांत', 'भूमिका' ही चित्रपटे त्यांनी या पद्धतीने बनवली. यानंतर त्यांनी काही सहकारी संस्थांकडून मदत घेऊन 'आरोहन', 'सुसमन' आणि 'अंतर्नाद' सारखी चित्रपटे निर्माण केली. श्याम बेनेगल यांच्या जाण्याने भारतातील समांतर चित्रपट क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. नुकताच त्यांनी ९०वा वाढदिवस साजरा केला. अभिनेत्री शबाना आझमी यांनी याबाबत त्यांच्या इंस्टाग्रामवर वाढदिवसाच्या पार्टीचे फोटो शेअर केले होते. श्याम बेनेगल यांचा जन्म १४ डिसेंबर १९३४ मध्ये सिकंदराबाद येथे झाला. कॉपी रायटर म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. नंतर आपल्या मेहनतीने आणि कामाच्या जोरावर त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत मोठे स्थान मिळवले. हिंदी चित्रपटसृष्टीतील त्यांचे योगदान विसरता येणार नाही.श्याम बेनेगल यांनी १९७४ मध्ये त्यांच्या चित्रपट दिग्दर्शनाची सुरुवात केली. 'अंकुर' नावाच्या चित्रपटाची त्यांनी निर्मिती केली. हा त्यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला पहिला चित्रपट होता. १९८६ मध्ये त्यांनी टीव्हीच्या दुनियेतही प्रवेश केला. त्यांनी 'यात्रा' ही मालिका दिग्दर्शित केली. त्याच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांमध्ये 'निशांत', 'मंथन', 'भूमिका', 'मंडी', 'कोंडुरा' सारख्या अनेक चित्रपटांचा समावेश आहे. केवळ चित्रपटच नाही तर 'भारत एक खोज' सारखी मालिका असो किंवा संविधानाच्या निर्मितीवर तयार केलेला माहितीपट असो या सगळ्याला अभ्यासकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. जगभरातील चित्रपट विषयक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या संस्थांमध्ये श्याम बेनेगल यांचे नाव अगत्याने घेतले जाते. ज्यात नसीरुद्दीन शाह, ओम पुरी, अमरीश पुरी, अनंत नाग, गिरीश कर्नाड, शबाना आझमी, स्मिता पाटील यांसारखे दिग्गज कलाकारांचा समावेश आहे. चित्रपटांशिवाय दूरदर्शनवरील 'भारत एक खोज' आणि 'कहता है जोकर', 'कथा सागर' या प्रसिद्ध मालिका श्याम बेनेगल यांनी दिग्दर्शित केल्या. बेनेगल यांनी त्यांचे गुरू सत्यजित रे आणि देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यावरही डॉक्युमेंट्री बनवल्या. शाम बेनेगल यांनी असे चित्रपट बनवले की जे फक्त त्या किंवा आजचा काळासाठी नव्हे, तर प्रत्येक काळात प्रासंगिक राहतील. ५० वर्षांपूर्वी त्यांनी बनविलेला चित्रपट आज ही पाहताना आजचा काळाशी तो चित्रपट सुसंगत वाटतो. आजही तेच वास्तव आपल्या शेजारी असल्याचे आणि आपण भोगत असल्याचे जाणवते. हीच त्या दिग्दर्शकाच्या कलेची हातोटी आहे, जी सर्वच काळात दिशादर्शक ठरते. शाम बेनेगल यांना सत्यजीत रे यांचा वारसदार मानले जात होते. सत्यजीत रे यांच्याकडून धडे घेणाऱ्या शाम बेनेगल यांनी ते सिद्धही करून दाखवले आहे. सत्यजीत रे यांच्या पाथेर पांचाली पाहून बेनेगल यांना आपणही चित्रपट बनवावे, असे वाटले. वृत्तपत्रांमधून वाचून त्यांनी आपली प्रतिभा वाढवली आणि चित्रपट बनविणे चालू केले. 'आक्रोश', 'तमस' आणि 'पार्टी' सारखे चित्रपट बनवताना सिनेमॅटोग्रामर म्हणून बेनेगल यांच्यासोबत काम करणारे गोविंद निहलानी यांनी त्यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. या सर्व लोकांबरोबर काम करताना बेनेगल हे या कलाकारांना, सहकाऱ्यांना नकळतपणे घडवत होते. आजही हे मोठे कलाकार शाम बेनेगल यांनी आपणास कसे घडवले, हे फार आदराने सांगतात. आता श्याम बेनेगलरुपी चालताबोलता इतिहास आता काळाच्या पडद्याआड गेला आहे.*

# तुरीचा खोडवा कधी ठेवावा अन् काय काळजी घ्यावी? जाणून घ्या सविस्तर




**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

तूर हे पीकखरीप हंगामात घेतले जात असले तरी उशिरापर्यंत झालेल्या पावसामुळे रब्बी हंगामातही पीक जोमात वाढते आणि जमिनीत ओलावा असल्याने फुलोरा येणे चालूच राहते. त्यामुळे शेतकरी तुरीचा खोडवा ठेवण्याचा विचार करतात. त्यानुसार खोडवा ठेवताना नेमकी काय काळजी घ्यावी. हे आजच्या भागातून समजून घेऊया....

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

आयसीपीएल ८७, आयसीपीएल ८८०, आयसीपीएल ३९ व आयसीपीएल १५१ या जातींचा खोडवा ठेवावा. कारण या जाती कमी कालावधीच्या आहेत.

विपुला, बीएसएमआर ७३६, बीएसएमआर ८५१ किंवा बीडीएन ७०८ व बीडीएन २०१३-४१ (गोदावरी) या जास्त कालावधींच्या असल्याने या जातींचा खोडवा ठेवू नये.रब्बी हंगामात २-३ पाणी देणे शक्य असल्यासच तुरीचा खोडवा ठेवावा.पक्व झालेल्या शेंगा तोडून गुच्छाच्या खाली १०-१५ सें.मी. अंतर ठेवून झाडाची फांदी कापून टाकावी.

हलकी वखरणी करून एकरी एक गोणी डीएपी खत देऊन पाणी द्यावे.

पहिल्या पिकाच्या शेंगा तोडल्यानंतर खोडवा ठेवताना दिलेल्या पाण्यानंतर दुसरे पाणी २० दिवसांनी पुन्हा फुटवे येते वेळी आणि तिसरे पाणी त्यानंतर २० दिवसांनी शेंगा भरताना द्यावे.

खोडवा पिकात ३-४ आठवड्यात एक खुरपणी व नंतर एक ते दोन कोळपण्या द्याव्यात.

फुलकळी लागताना व फुलोरा जोमात असताना (दोन वेळा) १ टक्का पोटॅशियम नायट्रेट किंवा २ टक्के युरिया किंवा डीएपीची फवारणी केल्याने दाण्याचे वजन वाढते, प्रतही चांगली मिळते.

शेंगा पोखरणारी अळी (घाटे अळी) च्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून फुलकळी येताना ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

५० टक्के फुलोरा आल्यानंतर एचएनपीव्ही ५०० एलई (हेलीओकील) १० मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारावे.

शेंगा भरण्याच्या अवस्थेत बेंझोएट, ५ टक्के एसजी, ३ मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारावे.

- डॉ. कल्याण देवळाणकर, सेवानिवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ




## मुळा खाल्ल्यानंतर अपचन, गॅसेस होतात? ३ गोष्टी लक्षात ठेवा, मुळ्याचा अजिबात त्रास होणार नाही

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक** - सध्या हिवाळा सुरू आहे. त्यामुळे बाजारातून फेरफटका मारल्यानंतर पांढरेशुभ्र मुळे भाज्यांच्या गाडीवर अतिशय आकर्षकपणे रचून ठेवलेले दिसतात. एरवी ते मिळत नाहीत. त्यामुळे ते घेण्याचा आणि त्याचे वेगवेगळे पदार्थ करून खाण्याचा मोह होतोच. आपण खाताना तर मोठ्या उत्साहात मुळ्याचे वेगवेगळे पदार्थ करून खातो. पण नंतर मात्र त्याचा त्रास होतो. काही जणांची सिडीटी वाढते तर काही जणांना गॅसेस होतात. त्यामुळेच मुळा खाऊन असे काही त्रास होऊ नयेत आणि मुळ्याचा छानपैकी आस्वाद घेता यावा यासाठी मुळ्याचा कोणताही पदार्थ खाताना थोडी काळजी घ्या आणि पुढे सांगितलेल्या काही गोष्टी करून पाहा...मुळा खाल्ल्यानंतर अपचन, गॅसेस असा त्रास होऊ नये म्हणून...

१. याविषयी आहारतज्ज्ञ लिमा महाजन यांनी सांगितलेली माहिती एनडीटीव्हीने प्रकाशित केली आहे.

यामध्ये त्या सांगतात की जर तुम्ही कच्चा मुळा खाणार असाल किंवा त्याचं रायतं करणार असाल तर खाण्यापुर्वी काही मिनिटांसाठी तो पाण्यामध्ये भिजत ठेवा. असं केल्यामुळे त्याच्यातले गॅसेस निर्माण करणारे घटक बऱ्याच प्रमाणात कमी होतात. त्यामुळे मग गॅसेस, पोट फुगल्यासारखे वाटणे असे त्रास होत नाहीत.

२. मुळ्याचा पराठा करून खाणार असाल तर त्या पराठ्यांमध्ये ओवा, बडिशेप, मिरेपूड, जीरे, काळं मीठ असे पचनासाठी उपयुक्त ठरणारे पदार्थ आवर्जून टाका. त्यामुळे मुळ्याचा त्रास होणार नाही. शिवाय मुळ्याचा पराठा दह्यासोबत खा. दही हे प्रोबायोटीक असल्याने ते पचनासाठी नक्कीच मदत करते.




३. उपाशीपोटी तसेच रात्रीच्या जेवणात मुळ्याचे पदार्थ खाणे टाळावे. मुळ्याचे पदार्थ दुपारच्या जेवणात घेणे कधीही अधिक चांगले. मुळा खाल्ल्यानंतर काही वेळ शरीराची हालचाल होणे किंवा चालण्याचा व्यायाम करणे गरजेचे आहे. तरच तो पचायला सोपा जातो.

# नव्या वर्षात करा आरोग्य संकल्प; 'या' गोष्टी करा, कधीच आजारी पडणार नाहीत

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक** - डिसेंबर महिना सुरु होताच आपण नवीन वर्ष सेलिब्रेट करण्यासाठी अनेक प्लान करत असतो. त्यासोबतच नवीन वर्षात अनेक गोष्टी करण्याचा संकल्प करत असतो. नवीन वर्षाची सुरुवात खराब जीवनशैली सुधारण्यासाठी, वाईट सवयी सोडण्यासाठी आणि आरोग्य सुधारण्यासाठी एक उत्तम वेळ आहे. प्रत्येक नवीन वर्षात आपण वेगवेगळे संकल्प घेत असतो.या संकल्पांमध्ये काही संकल्प आपल्या आरोग्याशी संबधित असतात. व्यायाम करणे, हेल्दी खाणे, वजन कमी करणे अशे संकल्प लोकप्रिय आहेत. परंतु काही लोकच या संकल्पाना पूर्ण करण्यात यशस्वी होतात. आणि अनेक जण काही दिवसातच हे संकल्प विसरुन जातात. म्हणून आज आम्ही तुम्हाला आरोग्याशी संबधित काही अशे संकल्प सांगणार आहोत जे तुम्ही आरामात पूर्ण करु शकता.

**संतुलित आहार घ्या**

तुमच्या जेवणाचे ताट रंगीबेरंगी पदार्थाने भरा. आहारात विविध प्रकारची फळे, भाज्या, कडधान्ये, ड्राय फ्रुट्स आणि धान्यांचा समावेश करा. जंक फूड आणि फास्ट फूड खाणं टाळा. प्रिजर्वेटीव्ह अन्न, साखर आणि अनहेल्दी फॅट्सचे सेवन करणे टाळा. दिवसभरात भरपूर पाणी प्या. दिवसभरात कमीत कमी ७ ते ८ ग्लास पाणी प्या. संतुलित आहार घेताना आहाराचा लहान भाग खा. एकाच वेळी जास्त प्रमाणात आहार घेणे टाळा.

**नियमित व्यायाम करा**

दररोज तुमच्या आवडीचा कोणताही व्यायाम करा. तुमच्या रोजच्या रुटीनमध्ये तुम्हाला आवडणाऱ्या कोणत्याही व्यायामाचा समावेश करा जेणेकरुन तुमची शारीरिक हालचाल होईल. दररोज कमीत कमी ३० मिनिटे व्यायाम करा. किमान ३० मिनिटे व्यायाम करण्याचे ध्येय ठेवा. व्यायामासह योगा किंवा ध्यान करा. मेंदूच्या




आरोग्यासाठी योगा किंवा ध्यानाचा सराव करा.यामुळे शारीरिकसह मानसिक आरोग्यालाही फायदा होईल.

**झोप घ्या-** दररोज नियमितपणे ७ ते ८ तासांची झोप घ्या. झोपण्याची एक ठराविक वेळ ठरवा. ठराविक वेळी झोपण्याची आणि उठण्याची सवय लावा. झोपण्यापूर्वी शांत वातावरण तयार करा. टीव्ही किंवा मोबाईलचा वापर करु नका. त्याऐवजी झोपण्यापूर्वी तुमच्या आवडीचे कोणतेही पुस्तक वाचा.

**ताण व्यवस्थापन**

ताणतणाव कमी करण्यासाठी रोज ध्यान आणि योगा करा. रोज कमीत कमी एक तास ध्यान करा. यामुळे मानसिक आरोग्य सुधारेल आणि ताणतणाव कमी होण्यास मदत होईल. तसेच तुमचे छंद जोपासा तुमच्या छंदासाठी वेळ काढा. दिवसभरात काही वेळ मित्र आणि कुटुंबासोबत घालवा. तसेच तुमच्या आवडत्या लोकांसोबत वेळ घालवा. आरोग्याची काळजी घ्या. आरोग्याची खबरदारी म्हणून नियमित आरोग्य तपासणी करा. वर्षातून एकदा संपूर्ण आरोग्याची तपासणी करा आणि दर ६ महिन्यांनी दातांची तपासणी करा.

**दिनचर्या सुधारा**

चांगल्या सवयी लावण्यासाठी दिनचर्येमध्ये बदल करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वात प्रथम डिजिटल डिटॉक्स करा. दिवसभरात मोबाईलचा वापर कमी करा. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे झोपण्यापूर्वी मोबाईलचा वापर कमी करा. किंवा झोपायच्या एक तास अगोदर मोबाईल वापरु नका. शरीराला रोज चालण्याची सवय लावा. काही वेळ चालल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात. घरच्या घरी आरोग्यदायी पदार्थ बनवा आणि दररोज हेल्दी ब्रेकफास्ट करा. शक्यतो बाहेरचे खाणं टाळा. रोज सकाळी काही वेळ सूर्यप्रकाशात बसा. स्वतः बद्दल सकारात्मक विचार करा. आणि स्वत:वर विश्वास ठेवा. तसेच आयुष्यातील लहान विजयांसाठी स्वत:ला बक्षीस द्या.

# 'महसूल'मधून अनुसूचित जमातींची ४६ पदे गायब

## अधिसंख्य ८० तर, रिक्त केवळ ३४ पदे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती : -** राज्यातील महसूल विभागात तलाठी, अव्वल कारकून, मंडळाधिकारी, लिपिक या गट-क' संवर्गातील अनुसूचित जमातींची एकूण ४६ पदे गायब झाल्याची माहिती उघडकीस आली आहे.

महसूल विभागात गट 'क'ची एकूण मंजूर पदे १९ हजार ६१० आहे. यातील २ हजार १८४ पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. अनुसूचित जमातीच्या भरलेल्या पदांची संख्या १ हजार ६७० आहे. यापैकी अनुसूचित जमातींचे जातवैधता सादर करणाऱ्यांची संख्या १ हजार १३७ आहे. जातवैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्यांची संख्या ५३३ आहे. पूर्वीचा ५१४ पदांचा अनुशेष शिल्लक आहे.

अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नियुक्त झालेल्या व नंतर मात्र जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या ८० आहे.




तर अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आल्यामुळे रिक्त झालेल्या पदांची संख्या ३४ दाखविण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ६ जुलै २०१७ची अंमलबजावणी राज्यात होत नसल्याचे वास्तव आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेर असलेल्या गट 'क'ची १९ पदांची जाहिरात दिल्याचे नमूद आहे. यापैकी सन २०२० व २१ मध्ये १८ पदे भरल्याचे नमूद आहे.

# खतांच्या किमतीत होणार वाढ, शेतकऱ्यांवर आर्थिक भार, लिंकिंग थांबविण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती -** रासायनिक खतांच्या किमती आधीच जास्त असताना, खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून दरवाढ जाहीर केली. शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.

शेतकऱ्यांना आधीच त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सोयाबीनचे दर वाढतील या अपेक्षेने शेतकऱ्यांनी विक्री थांबवली होती; मात्र, उलट दर कमी झाले. खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून रासायनिक खतांच्या किमती वाढवल्या आहेत. उदाहरणार्थ, डीएपी (डाय-अमोनियम फॉस्फेट) खताची किंमत प्रति पिशवी १ हजार ३५० रुपयांवरून १ हजार ५९० रुपयांवर गेली आहे. टीएसपी ४६ टक्के (ट्रिपल सुपर फॉस्फेट) खताची किंमत एक हजार ३०० रुपयांवरून एक हजार ३५० रुपयांवर वाढली आहे. १०:२६:२६ आणि १२:३२:१६ या खतांच्या किमती १ हजार ४७० रुपयांवरून १ हजार ७२५ रुपयांवर वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत, शेतकरी वर्गातून



खतांच्या किमती वाढवण्याऐवजी कमी करण्याची मागणी होत आहे.

त्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी योग्य बाजारभाव मिळावा, तसेच शेतीसाठी आवश्यक इनपुट्सच्या किमती नियंत्रणात ठेवाव्यात, अशी त्यांची अपेक्षा आहे. एकीकडे शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला असताना, दुसरीकडे नवीन वर्षात खताचे भाव वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याने आम्ही शेती करायची, तरी कशी, असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २६ डिसेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# शेतकऱ्यांनो सावधान ......

# राज्यात २७-२८ डिसेंबरदरम्यान गारपीट

## मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती –** २७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. लंडन येथील रीडिंग युनिव्हर्सिटीच्या नॅशनल सेंटर फॉर सायन्स अँड डिपार्टमेंट ऑफ मेट्रोलॉजीचे संशोधन शास्त्रज्ञ डॉ. अक्षय देवरस यांनी हा अंदाज दिला आहे.

२७ डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे.



मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.२८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल.

२९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान असेल आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.


प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाने केले आहे.

खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करण्याचे कृषी विभागाने आवाहन केले आहे.

# महापालिका निवडणूक युती संबधी निर्णय स्थाथिक पातळीवरच

## प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नागपूर–** राज्यातील विविध महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थेतील निवडणुकीत महायुतीतील घटक पक्षांसोबत युती करावी अथवा करू नये बाबतचा निर्णय हा स्थानिक पातळीवरच होईल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे सांगितले.



नागपुरातील प्रेस क्लबमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ओबीसी आरक्षण संदर्भात सर्वोच्च न्यायालयात जानेवारी महिण्यात निर्णय अपेक्षित आहे.

यानुसार मार्च, एप्रिलमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका राज्य निवडणूक आयोगामार्फत घेण्याची शक्यता आहे. दरम्यान राज्यातील विविध महापालिका अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत महायुतीतील घटक पक्षांसोबत युती करावी अथवा करू नयेबाबतचा निर्णय स्थानिक पदाधिकारीच घेतील. त्यांच्यावर राज्यातील प्रदेश कार्यकारणी निर्णय लादणार नाही, असे बावनकुळे म्हणाले.

### वाळू माफीयांचा बंदोबस्त करणार



राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळूच्या मागणीच्या तुलनेत पुरवठ्याबाबत वाळू धोरण निश्चित केले जाईल. त्याबाबत शासनाने एक समिती गठीत केली होती. समितीचा अहवालही नुकताच शासनाकडे सादर झाला आहे. हा अहवाल मी लवकरच बघणार आहे. त्यानंतर समितीच्या सूचनेनुसार सर्वत्र अंमलबजावणीतून वाळू माफीयांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला जाईल, सध्या राज्यात वाळू माफीयांकडून लुट सुरू आहे. ते एक ट्रक वाळू ६० ते ७० हजार रुपयांना विकतात. वाळूच्या तुटवड्यामुळे बांधकाम व्यवसायिक त्रस्त असून काहींचे कामही प्रभावित झाल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

# जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर प्रयत्नांत सातत्य ठेवा

## डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे संशोधक विद्यार्थ्यांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती –** आज जी माणसं मोठी झाली आहेत असे आपण मानतो, ते नक्कीच इतरांपेक्षा वेगळे होते आणि जीवनात असेच मोठे आणि यशस्वी व्हायचे असेल, तर प्रयत्नांमध्ये सदैव सातत्य ठेवा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात दोन दिवसीय आविष्कार – २०२४ स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्ष स्थानी कुलगुरू डॉ. मिलींद



बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, नवोपक्रम, नव संशोधन व साहचर्य संचालक डॉ. अजय लाड, आयोजन सचिव डॉ. गजानन मुळे उपस्थित होते.डॉ. फडणवीस म्हणाल्या, संशोधनाची सुरू केलेली प्रक्रिया आव्हान म्हणून स्वीकार करा. प्रथमत: आपण सुरू केलेलं कोणतंही कार्य फार लहान आहे, असेही समजू नका. कारण अशा लहानशा कृतीतूनच अनेक माणसं मोठी झाली आहेत, असे सांगून त्यांनी अनेक उदाहरणे देखील दिलीत. आपल्यातील क्षमता ओळखा. शासनाच्या अनेक योजनाही आहेत, त्याचाही लाभ घ्या. कोणत्याही संस्थेत क्षमतेपेक्षा अधिक जागा भरल्या जावू शकत नाही. देशातील बेरोजगारी दूर करण्यासाठी आपलाही पुढाकार तितकाच आवश्यक आहे, असे सांगून पुढील जग हे डिजिटल असणार आहे व या जगात आपल्याला टिकून रहावयाचे असेल, तर तेवढीच क्षमता आपल्यातही निर्माण झाली पाहिजे, त्यासाठी सातत्य ठेवा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, विद्यार्थ्यांनी समाजपयोगी संशोधन आणि संकल्पना राबवाव्यात. विद्यापीठाला कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या रुपाने उत्तम नेतृत्व लाभले आहे. आव्हान स्पर्धेत विद्यार्थ्यांना जे जे आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घ्यावे लागले, ते कुलगुरूंनीही विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, यासाठी स्वत: करुन दाखविले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी यातून प्रेरणा घेवून आपले भविष्य घडवावे. इन्क्युबेशन सेंटरला संशोधनासाठी जी काही मदत लागेल, ती प्रशासनाकडून केली जाईल, असे आश्वासनही याप्रसंगी कुलसचिव डॉ. असनारे यांनी दिले.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक व अहवाल वाचन डॉ. वैशाली धनविजय यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. हर्षा देशमुख व डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार भौतिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. गजानन मुळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, संशोधक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.–

### संशोधनाकरीता विद्यापीठात उपक्रम सुरू करणार – कुलगुरू

*विद्यार्थ्यांना संशोधन करता यावे, याकरीता विद्यापीठात आणखी उपक्रम सुरू केले जातील. त्याचबरोबर त्यासाठी आवश्यक ती आर्थिक मदतही करण्यात येईल. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये सुध्दा संशोधनासाठी विशेष सेल सुरू करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी संशोधनाच्या संधीचा अधिकाधिक लाभ घ्यावा आणि पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत जास्तीत जास्त पुरस्कार मिळवून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नावलौकीक वाढवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना केले.

### विद्यापीठात आविष्कार-२०२४ स्पर्धेचा समारोप

# जिल्ह्यात रब्बीत १.४१ लाख हेक्टरवरील पेरणी आटोपली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती–** १३जिल्ह्यात या वर्षी समाधानकारक पाऊस झाला आहे. या पाक्सामुळे जिल्ह्यात रब्बीचा पेरा वाढणार आहे. जिल्ह्यात रब्बीचे सरासरी क्षेत्र १ लाख ४८ हजार ८७९ हेक्टर आहे. त्यापैकी आतापर्यंत १ लाख ४१ हजार ४०९ हेक्टरवर पेरणी आटोपली आहे. याची टक्केवारी ९५ इतकी आहे. यंदाही सर्वात जास्त हरभराचा पेरा शेतकऱ्यांनी केला आहे. ९८ हजार ९५ हेक्टरवर पेरणी एकट्या हरभऱ्याची झाली आहे. तर त्या खालोखाल के हजार २१० हेक्टर वर गव्हाची पेरणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यात पावसाच्या वार्षिक सरासरीच्या पेक्षा अधिक पाऊस पडला होता. त्यामुळे रब्बी पिकांचीशाश्वती शेतकऱ्याला होती. गेल्या काही वर्षांपासून रब्बी पेरणी वाढली आहे. मात्र, या वर्षी जिल्ह्यात रब्बी पेरणीचे क्षेत्र आणखी वाढणार असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्ह्यात यंदा चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळे रब्बी पेरणीकडे शेतकऱ्यांचा कल आहे. जिल्ह्यातील५६ सिंचन प्रकल्पांपैकी बहुतेक प्रकल्प भरून वाहत आहेत. यावर्षी झालेल्या दमदार पावसाने रब्बीच्या पिकावर बळीराजाची आस निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात रब्बीचा पेरा वाढणार आहे. जिल्ह्याच्या रब्बी पेरणीचे सरासरी क्षेत्र १ लाख ४८ हजार ८७९ हेक्टर आहे. जिल्ह्यात या तुलनेत आत्तापर्यंत १ लाख ४१ हजार ४०९ हेक्टरवर पेरणी झाली आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पेरा हरभऱ्याचा झाला आहे. तसेच रब्बी गव्हाचा पेराही अधिक झाला आहे. या वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे मक्याचे क्षेत्रही वाढले आहेत. आत्तापर्यंत २ हजार ३०८ हेक्टरवर मक्याची पेरणी झाली हरभरा पिकाचे क्षेत्र वाढले आहे.

### जिल्ह्यातील पेरणी स्थिती

रब्बी मका-२३०८ हेक्टर, रब्बी ज्वारी-२५० हेक्टर, गहू-३६२१० हेक्टर, हरभरा-९८०९५ हेक्टर, कांदा-२०३२ हेक्टर, मोहरी-२० हेक्टर, भाजीपाला-२०५८ एवढी पेरणी झालेली आहे. तर जिल्ह्यात सूर्यफूल व करडई पिकाची अद्याप एकाही ठिकाणी पेरणी झाल्याची नोंद नाही




# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत जिल्ह्यात २७ कोटी ५० लाखाचे अनुदान ग्राहकांच्या खात्यात जमा

## अमरावती जिल्ह्याने घेतली पश्चिम विदर्भात आघाडी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती,** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला अमरावती जिल्हात उत्तम प्रतिसाद मिळाला आहे, जिल्ह्यातील एकूण ४ हजार ६२९ वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्या कडील प्रकल्पाची एकूण स्थापित क्षमता १९.७४ मेगावॅट आहे. अठ्ठ्यात्तर हजारापर्यंत अनुदान असलेल्या या योजनेत जिल्ह्यातील लाभार्थ्यांना ३३ कोटी १० लाखाचे अनुदान मंजूर झाले आहे, त्यापैकी ३ हजार ५५२ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात २७ कोटी ५० लाखाचे अनुदान जमा झाले असुन ऊर्वरीत लाभार्थ्यांच्या खात्यात हे अनुदान वळते करण्याची प्रक्रीया सुरु आहे. महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या या योजनेत महावितरणने पश्चिम विदर्भात एकुण १० हजार ४६९ ग्राहकांच्या छतावर स्थापन करण्यात आलेल्या रूफ टॉप सोलरमध्ये अमरावती जिल्ह्यात (४,६२९),अकोला (१९५५) , बुलढाणा (१६९०), यवतमाळ (१५८४) आणि वाशिम (६११) यांचा क्रम लागतो. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविणाऱ्या वीज ग्राहकांना एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ३० हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ६० हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या प्रकल्पाला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या सौर यंत्रणेतून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीज बिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणने ग्राहकांना लागणारे सोलर नेट मीटर विनामूल्य पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्राहकांचे पैसे वाचण्यासोबत त्यांना मोबाईल फोनवरच वीजनिर्मिती, वीज वापर, अतिरिक्त युनिट इत्यादी माहिती दररोज मिळेल. त्यानुसार त्यांना वीजवापराचे नियोजन करून वीजबिल शून्य येण्यासाठी नियोजन करता येणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी www.pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. महावितरण ही या योजनेची अंमलबजावणी करणारी राज्यातील नोडल एजन्सी आहे. महावितरणने यासाठी एक स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना व पुरवठादारांना महावितरणच्या कार्यालयात येण्याची आवश्यकता राहत नाही. नोंदणी केल्यापासून अंतिम मंजुरीनंतर प्रकल्प सुरू करेपर्यंत 'फेसलेस' व 'पेपरलेस' पद्धतीने काम चालू राहते. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत गतिमानता आली आहे.

प्रधानमंत्री सुर्यघर योजनेत ग्राहकांचे वीज बिल शुन्यापर्यंत कमी होते,शिवाय योजनेत ७८ हजारपर्यंत अनुदान आहे.तसेच वीज ग्राहकांना लागणारे नेट मीटर मोफत देण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे.त्यामुळे जिल्ह्यातील वीज ग्राहकांनी जास्तीत जास्त या योजनेत सहभाग नोंदवावा.

**– दीपक देवहाते ,** अधीक्षक अभियंता

# उद्याला न्यू हायस्कुल मेनचा शताब्दी महोत्सव

## शताब्दी विशेषांकाचे नितीन गडकरी यांच्या हस्ते विमोचन



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित न्यू हायस्कूल मेनच्या शताब्दी वर्षाचा समारोपिय कार्यक्रम २७ डिसेंबरला शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला. त्या निमित्ताने केंद्रीय सडक परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते शताब्दी विशेषांकाचे विमोचन करण्यात येणार असल्याची माहिती नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा डॉ. माया शिराळकर यांनी बुधवारी पत्रपरिषदेत दिली.

त्यांनी सांगितले की, शाळेने २०२४ या वर्षभरात आजी-माजी विद्यार्थ्याकरिता विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शताब्दी समारोहाची सुरुवात जानेवारी २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या एकदिवसीय शाळेने करण्यात आली. त्यामध्ये पुन्हा एकदा लहान होऊन संपूर्ण दिवस घालवला व शालेय जीवनाचा आनंद घेतला. या शताब्दी वर्षाचा समारोपिय कार्यक्रम २७ डिसेंबरला आहे. केंद्रीय सडक

परिवहन मंत्री नितीन गडकरी विशेष अतिथी म्हणून कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून प्रवीण पोटे पाटील,आमदार रवी राणा, हव्याप्रमंडळाचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य, समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया, ॲड. जुगलकिशोर गिल्डा, आनंद परचुरे, श्याम बंग, डॉ. सुभाष कसबेकर, उमाकांत मालेगांवकर, किशोर देशमुख उपस्थित राहतील. दुपारी २.३० वाजता एक शाम पुराने यारों के नाम या माजी विद्यार्थी प्रस्तुत सिने गितांचा बहारदार कार्यक्रम होईल. संस्थेचे आद्य संस्थापक कै. दादासाहेब खापर्डे यांनी काढलेल्या या शाळेचा १०० वर्षाचा हा दिर्घ प्रवास अखंड सुरु आहे. अधिकाधिक संख्येने कार्यक्रमाला आजी माजी विद्यार्थ्यांसह नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. पत्रपरिषदेला डॉ. माया शिराळकर, डॉ. सुभाष कसबेकर, पं. किशोर नवसाळकर, निनाद सोमण, डॉ. अविनाश मोहरील, अनंत निबोळे, वर्षा जदबंसी, उल्हास बपोरीकर, जयश्री पांडे, वल्लरी ठीपसे, शिवा पिंपळकर उपस्थित होते.

### ३० ला नूतन कन्या शाळेच्या माजी विद्यार्थिनींची शाळा

नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित नूतन कन्या शाळा ही राष्ट्रीय शिक्षणाच्या हेतुने दादासाहेब खापर्डे यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेतून स्थापन केली. दैदिप्यमान इतिहास लाभलेली नूतन कन्या शाळा ही शतकपूर्तीकडे वाटचाल करित आहे. या वाटचालीमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शाळेशी जुळण्याकरिता वेगवेगळ्या कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन केले आहे. माजी विद्यार्थिनींशी संपर्क करणे सुरु झाले असून या प्रक्रियेमध्ये जवळपास दोन हजार माजी विद्यार्थिनींशी संपर्क झाल्याचे शिराळकर यांनी सांगितले. रविवार २९ डिसेंबरला माजी विद्यार्थीनी व माजी शिक्षकांसह दुसऱ्या स्नेहभेटीचे आयोजन सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्धघाटन डॉ. माया शिराळकर यांच्या अध्यक्षतेत शाळेच्या माजी विद्यार्थीनी व आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या स्नेहभेट कार्यक्रमातच ग्रंथालय उद्धाटन, जीवशास्त्र प्रयोगशाळा उद्धाटन, डिजीटल क्लासरुम उद्धाटन, सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

# मोर्शीत गुटखा विक्रेत्यावर एलसीबीची धाड

## दोघांना पकडले, १.५५ लाखांचा सुगंधित पानमसाला जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ मोर्शी-** मोशी शहरातील विविध पानटपऱ्या, लहान-मोठे किराणा दुकानातून मोठ्या प्रमाणावर अवैध गुटख्याच्या पुड्या गेल्या काही दिवसापासून विक्री केल्या जात होत्या. याकडे पोलिसाकडून दुर्लक्ष होत असताना अमरावतीच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध सुगंधी गुटखा विक्री करणारा व्यापारी अब्दुल राजीक मोहम्मद आरीफ (वय २६, रा. शम्स कॉलनी मोशी), तौसीफ खान कलीम खान (वय ३२ वर्षे, रा. खोलवटपुरा मोशी) यांच्याविरुद्ध कारवाई केली.

जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी गुटख्याची अवैधरित्या वाहतूक, विक्री, साठवणूक करण्याविरुद्ध जास्तीत जास्त कारवाया करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोर्शीउपविभागात रविवारी पंट्रोलिंग करीत होते. दरम्यान शम्स कॉलनी येथील अब्दुल राजीक मोहम्मद आरीफ याने त्याच्या राहत्या घरी सुगंधित तंबाखूजन्य पानमसाला साठवून ठेवल्याची माहिती पथकाला मिळाली.

त्या आधारावर पोलीस पथकाने घरझडती घेतली अब्दुल राजिक याच्या घरात १ लाख ५५ हजार ७०० रुपयांचा सुगंधित गुटखा मिळून आला. तसेच त्याच हॉलमध्ये अब्दुल राजिकचा मित्र तौसीफ खान कलीम खान याच्याही ताब्यातून

### एकूण ३५ हजार २५ रुपयांचा माल

जप्त करण्यात आला. मुद्देमाल व आरोपींना पुढील कारवाई करीता स्थानिक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पो- लीस अधिक्षक पंकज कुमावत, पो- लीस निरीक्षक किरण वानखडे, यांचे मार्गदर्शनात फौजदार सागर हटवार, पोलीस अंमलदार बळवंत दाभणे, रवि बावणे, पंकज फाटे, विलास रावते यांच्या पथकाने ही कारवाई केली.


### श्रीविठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे

# चंदन उटी कार्यक्रम ,पौष मास मांड शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६चांदुर रेल्वे**

चांदुर रेल्वे तालुक्यातील श्रीक्षेत्र सावंगाविठोबा येथील श्रीविठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे ३० नोव्हेंबर २०२४ सकाळी ५ वाजता संस्थानचे लहान मंदिरात विधीवत ढाल बसवून मुख्य मंदिरात पौष मांडीचा शुभारंभ महाराजांच्या गणाने विश्वस्त मंडळ आणि भाविक भक्तांचे उपस्थित होत आहे. सकाळी ९ वाजता संस्थानमध्ये सोमवती अमावस्या निमित्त भजनासह खोलाड तिरी स्नानाचा कार्यक्रम, दुपारी ४ वाजता संस्थानच्या वतीने अमावस्या निमित्त श्चंदन ऊटीचा कार्यक्रमर आणि रात्री ८ ते १० संस्थानमध्ये अवधूत नाम प्रबोधनकार वासुदेव चोपकर, वरुऱ्हा जि. अमरावती यांचा महाराजांचे ओवीवर प्रवचन इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

चंदनउटी नंतर बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता श्महाप्रसाद कार्यक्रमर संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात



आयोजित करण्यात आला आहे.

संस्थानमध्ये ३० डिसेंबर २०२४ ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत संस्थान तर्फे पौष मासर निमित्त अखंड जागृती भजनर मांडीचे आयोजन करण्यात आले आहे. या करिता संस्थानचे वतीने नियोजन करण्यात आले आहे. संस्थान तर्फे सहभागी अवधूत भजन मंडळाचा सन्मान करण्यात येऊन दैनंदिन चहा, नास्ता आणि भोजन इ. व्यवस्था करण्यात आली आहे.तरी सर्व भाविक-भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवालसर्वविश्वस्तविनायक पाटील, वामण रामटेके, गोविद राठोड, अनिल बेलसरे, फुलसिग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड वैभव मानकर, स्वप्निल चौधरी समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# दहिहांडा मार्गावरील एसटी बसची हुलकावणी

## संतप्त विद्यार्थ्यांनी दर्यापूर बसस्थानकातून निघणाऱ्या सर्व बसेस रोखल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ दर्यापूर-** दर्यापूर दहीहंडामार्गे दररोज सायंकाळी ५.३० च्या एसटी बसच्या फेरीने विद्यार्थ्यासह प्रवाशांना हुलकावणी दिल्याने संतप्त विद्यार्थ्यांनी दर्यापूर बसस्थानकातून निघणाऱ्या सर्व बसेस रोखल्या.

दहीहंडामार्गे धावणाऱ्या एसटी बसेस दररोज उशिरा धावतात. दर्यापूर येथे शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थ्यांना त्याचा मानसिक त्रास सहन करावा लागतो. दहिहांडा मार्गावर धावणाऱ्या एसटी बसेस दुपारी १.३० वाजतापासून रस्त्यावर निघाल्याच नाही. शाळेतील



विद्यार्थी व विद्यार्थिनी पाच वाजतापासून बस स्टॉपवर बसच्या प्रतीक्षेत होते. ५.३० वाजता दहीहंडामार्गे धावणारी एसटी बससुद्धा निघाली नाही.विद्यार्थ्यांनी रेकॉर्डवर बघितले असता, ती गाडी अंजनगावमार्गे निघून गेल्याचे आढळले. जे. डी. पाटील महाविद्यालय व आदर्श हायस्कूल तसेच रत्नाबाई शाळेमधील विद्यार्थी तसेच दहीहंडामार्गे जाणारे विद्यार्थ्यांनी या त्रासाला कंटाळून सायंकाळी ७ वाजतापासून दर्यापूर एसटी बस स्थानकातून निघणाऱ्या गाड्या रोखल्या. विद्यार्थ्यांनी रास्तारोको आंदोलन करीत एकही बस स्थानकाबाहेर निघू दिली नाही. बसस्थानक व्यवस्थापकांना विचारणा केली असता त्यांनी गाडी सोडण्यात चुक झाल्याचे सांगितले. दरम्यान दर्यापूरचे ठाणेदार सुनील वानखडे तसेच सुनील साबळे, सिद्धू आठवले यांनी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना दहीहंडामार्गे जाणाऱ्या सर्व प्रवाशांना विनंती केली. आजच्या दिवस जी बस मिळेल, त्या बसने जावे, उद्यापासून सर्व नियोजन विद्यार्थ्यांच्या म्हणण्याप्रमाणे होईल, अशी शास्वती देत आंदोलनाची सांगता केली. त्यानंतर विद्यार्थी व प्रवासी दहीहंडामार्गे निघून गेले.

# थर्टी फस्टला बीअरबार पहाटे ५ वाजेपर्यंत सुरू राहणार

## मध्यरात्री १ वाजेपर्यंत वाईन शॉपला मुभा, गृह मंत्रालयाने आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती-** थर्टी फस्ट म्हटलं की सर्व वयोगटातील महिला, पुरूष अतिशय उत्साहात एन्जॉय करत साजरा करतात. यामध्ये मद्यपींची संख्या अधिक



असते. परंतु, यंदाच्या थर्टी फस्ट सेलिब्रेशन मध्ये मद्यपींची चांगलीच बल्ले-बल्ले होणार आहे. कारण गृहमंत्रालयाने पहाटे ५ वाजेपर्यंत बीअरबार, परमिट रूम व क्लब सुरू राहणार असल्याचे आदेश जारी केले. नववर्षाच्या स्वागता साठी ३१ डिसेंबरला रात्री १२

वाजताच्या ठोक्याला तरूणाईसह विविध वयोगटातील लोकहीं थिरकतात. हॉटेल्स, क्लबकडून खास मद्य पाटयर्यांचे आयोजन करण्यात येते. थर्टी फस्ट म्हणून साजऱ्या

होणाऱ्या नववर्षाच्या स्वागताला हॉटेलकडूनही खास पॅकेज दिले जातात. या आनंदात कुठेच अडसर नको म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाने नाताळ आणि नव वर्षाच्या स्वागतासाठी मद्यालये रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. बीअरबार पहाटे पाच पर्यंत सुरू राहणार आहे.

सरत्या वषार्ला निरोप देण्यासाठी आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी थर्टी फस्ट ची रात्र अविस्मरणीय करण्यासाठी शहरातील विविध हॉटेल, बार, क्लबमध्ये खास पाटर्यांचे आयोजन करण्यात येते. देशी, विदेशी दारूचा समावेश असलेल्या पार्या रंगतात. नाताळ आणि नवषार्साठी २४ डिसेंबर, २५ डिसेंबर आणि ३१ डिसेंबरपर्यंत नियमात शिथिलता देण्यात आली आहे.

# जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात ४८ कोटी रुपयांच्या निविदा रखडल्या।

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६अमरावती,**

जिल्हा परिषेद बांधकाम विभागाने सन २०२४/२५ या आर्थिक वर्षात क वर्ग तीर्थक्षेत्र, ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाच्या सुमारे ४८ कोटींच्या कामांना आचारसंहितेपूर्वीच प्रशासकीय मान्यता दिली. मात्र आचारसंहितेमुळे निविदा प्रकिया रखडून गेली. त्यामुळे ठेकेदाराची कामासाठीही धावपळ कमी झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

जिल्हा परिषद बांधकाम विभागाला सण २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हा वार्षिक योजनेतून ग्रामीण भागातून क वर्ग तीर्थक्षेत्र विकासाचे १०२ कामांसाठी १२ कोटी, ३०-५४ लेखाशिर्षाअंतर्गत ग्रामीण कामाच्या ८० कामाकरिता २१ कोटी ४५ लाख आणि ५०-५४ या लेखाशिर्षअंतर्गत इतर जिल्हामार्गाच्या ३७ कामाकरिता १४ कोटी १४ लाख असा एकूण ४७ कोटी ५९ लाख रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला होता.

त्यानुसार बांधकाम विभागाने वरील विकास कामाच्या प्रशासकीय मान्यतेसाठीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर केला होता. यानुसार क वर्ग तीर्थक्षेत्र




विकास, ग्रामीण मार्ग आणि इतर जिल्हा मार्गाच्या कामांना आचारसंहिता लागण्यापूर्वीच प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

मात्र १५ ऑक्टोबरपासून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने बांधकाम विभागाचे ४७ कोटी ५९ लाख रुपयाची कामे अडचणीत आली. परिणामी या कामाची निविदा प्रकिया रखडून गेली.

निविदा निघाल्याशिवाय ठेकेदारांना कामे मिळत नाही. वरिष्ठ पातळीहून तसे आदेश आले नाही. प्रशासकीय मान्यता असतानाही कामे होत नसल्याने ग्रामीण भागातील विकास कामांना एक प्रकारे खीळ बसल्याचे बोलले जात आहे. जि. प.च्या बांधकाम विभागाने वरिष्ठ पातळीवर बोलून मंजूर असलेली कामे तातडीने सुरु करावी, अशी मागणी केली जात आहे.

> बांधकाम विभागाला क वर्ग तीर्थक्षेत्र विकास, ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाच्या जवळपास ४७ कोटी ५९ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मात्र आता कामांचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यता आदी प्रशासकीय कामे केली जातील. निविदेची पुढील प्रक्रिया राबविली जाईल, त्यानंतर कामना सुरवात होईल.
>
> – **दिनेश गायकवाड,** कार्यकारी अभियंता जीप अमरावती

# शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख १२६ वा जयंतीउत्सव

## केळी परीषदेत मशागत ते निर्यातीपर्यंत साखळी विषद, डॉ. पंजाबराव देशमुख राज्यस्तरीय केळी परिषद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती –** पर्याची पिक म्हणून विदर्भातील शेतकऱ्यांनी केळी पिकाचा विचार करावा यासाठी केळीच्या विविध जातीची माहिती देण्यासोबतच मशागत ते निर्यातीपर्यंतची संपूर्ण साखळी मांडणारी 'डॉ. पंजाबराव देशमुख राज्यस्तरीय केळी परिषद' श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रातील केळी बागांच्या परिसरात पार पडली. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२६ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि जैन इरिगेशन सिस्टीमच्या संयुक्त वतीने आयोजित या परिषदेचा हजारो शेतकऱ्यांनी लाभ घेतला. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या केळी परिषदेचे उद्धाटन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे हस्ते झाले. विधान परिषद सदस्य आमदार किरण सरनाईक,



शेतकरी नेते व दै. देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, प्रगतीशील केळी उत्पादक माजी खासदार अशोक मोहोळ म्हणून उपस्थित होते.

राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची चे संचालक डॉ. आर. सेल्वराजन, आंतरराष्ट्रीय केळी तज्ञ व जैन इरिगेशन सिस्टीमचे उपाध्यक्ष डॉ. के. बी. पाटील, विठ्ठल गंगा फार्मस प्रोड्युसर कंपनी, निमगाव, सोलापूरचे संचालक डॉ. युवराज शिदे, कृषी व जलतज्ञ डॉ. सुधीर भोंगळे, प्रशांत भोयर यांनी प्रमुख वक्ते म्हणून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या परिषदेत केळीचे भरघोस उत्पादन घेणारे विदर्भातील पाच शेतकऱ्यांना 'डॉ. पंजाबराव देशमुख केळीरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या शोतकरांमध्ये भगवंत महासिंग इंगळे, वरणा जिल्हा बुलढाणा, उमेशतुळशीराम भोंडे, अंजनगाव सुर्जी, विकास विजयराव देशमुख, पणज तालुका आकोट, कुंदन देवरावजी वाघमारे, पवनार आणि श्रीकांत छत्रपती धोंडे, इनायतपूर तालुका चांदूर बाजार यांचा समावेश होता. परिषदेला उपस्थित सर्व पाहुण्यांचा अध्यक्ष आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कारकरण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्षॲड. गजाननराव ॲड.जे.व्ही. पाटील पुंडकर, पूसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य प्रा. सुभाष बनसोड, सचिव डॉ.वि.गो. ठाकरे, आयोजन समिती सचिव प्राचार्य डॉ. समीर लांडे, सदस्य प्राचार्य डॉ. सी. एम. देशमुख, डॉ. नंदकिशोर चिखले, डॉ.ए. एच. ढोबळे, डॉ.आर.एस.खाडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

या परिषदेचे आयोजन श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. केळी परिषद आयोजन समितीचे अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आपल्या प्रास्ताविका गोजे यांनी आपल्या भूमिका विषद केली. अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उद्धाटक कुलगुरू डॉ. शरद गडाख, आमदार किरण सरनाईक, संपादक प्रकाश पोहरे, माजी खासदार अशोक मोहोळ, डॉ. आर. सेल्वराजन यांनी उद्घाटन सोहळ्यात आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. राजेश मिरगे यांनी केले तर आयोजन समितीचे सचिव प्राचार्य डॉ. समीर लांडे यांनी आभार मानले.

# राज्य सरकारची योजना : चार टक्के व्याजाने २० लाखांपर्यंत कर्ज

## उद्योजक व्हायचंय; महिला समृद्धी कर्ज योजनेचा घ्या लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

स्वतःकडे कलागुण असूनही अनेक महिलांना पैशांअभावी त्यांचा स्वतःचा व्यवसाय उभा करता येत नाही. उद्योजिका होण्याचे त्यांचे स्वप्न हवेतच विरून जाते. अशा महिलांना आधार देणारी 'समृद्धी कर्ज योजना' राज्य सरकारने सुरू केली आहे. महिला उद्योजकांना पाठिंबा देणे आणि त्यांच्या व्यवसायांना चालना देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.




महिलांना स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी आर्थिक पाठबळाची आवश्यकता भासते. आर्थिक कारणांमुळे त्या लघु किंवा मध्यम उद्योग सुरू करू शकत नाहीत. सरकारने महिलांसाठी अनेक योजना आणल्या असल्या, तरी समृद्धी कर्ज योजनेतून त्यांना चार टक्के व्याजाने किमान ५० हजार ते २० लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. मात्र, या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांनी एकत्र येऊन बचतगट स्थापन करणे आवश्यक आहे. राज्याच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाकडून ही योजना राबविण्यात येत आहे.

**कर्जासाठी लागणारी कागदपत्रे**

बँक खाते, आधारकार्ड, उत्पन्नाचा, जन्माचा, जातीचा दाखला, रहिवासी दाखला, मोबाइल नंबर, व्यवसाय प्रकल्पाच्या खर्चाचे अंदाजपत्रक, बचत गटाच्या पॅनकार्डची प्रत, बँक खात्याचे पासबुक, व्यवसायासाठी वापरल्या जाणाऱ्या जागेचा पुरावा.

**तीन वर्षांत फेडा कर्ज**

वार्षिक चार टक्के व्याज दराने कर्ज दिले जाते.राष्ट्रीय महामंडळाकडून ९५ टक्के आणि राज्य महामंडळाकडून पाच टक्के कर्ज दिले जाते. कर्ज मिळाल्यानंतर चार महिन्यांच्या आत त्याचा वापर करणे आवश्यक आहे. मिळालेल्या कर्जाची रक्कम तीन वर्षांच्या आत फेडणे आवश्यक आहे. महिला अर्जदाराने अर्जावर खोटी माहिती दिल्यास दंड होऊन योजनेचे लाभ परत घेतले जातील.

कर्जासाठी अर्ज कसा करावा?या योजनेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. जवळच्या जिल्हा कार्यालयातील सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाकडे अर्ज जमा करावा. अर्ज जमा केल्याची पोचपावती घ्या. अर्जामध्ये कर्जाचा उद्देश, पूर्ण झालेले व्यावसायिक प्रशिक्षण, कर्जाची रक्कम यांचा तपशील भरावा.

**महिला समृद्धी कर्ज योजनेसाठी पात्रता**

अर्जदार महिला मागासवर्गीय किंवा अनुसूचित जातीमधील असावी, बचतगट आणि समाजातील मागास घटकांमधील महिला उद्योजकांनाच या योजनेचा लाभ मिळेल, कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसावा. महिलेचे वय १८ ते ५० दरम्यान असणे आवश्यक आहे. फक्त महाराष्ट्रातील महिलांनाच या योजनेचा लाभ दिला जातो. अर्जदार महिला बचत गटाची सदस्य असणे आवश्यक आहे. स्थापनेनंतर दोन वर्षांनी महिला बचत गटांना या योजनेचा लाभ घेता येतो. अर्जदार कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्थेमध्ये डिफॉल्ट नसावा.

# शेळी, मेंढी पालनासाठी ७५ टक्के अनुदान, २५१२ जणांची नोंदणी

## पशुसंवर्धन विभाग : यशवंतराव होळकर महामेष योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

मेंढीमेढीपालन व्यवसायाला प्रोत्साहनदेण्यासाठी तसेच राज्यातील भटक्या जमाती व तत्सम समाजामधील पशुपालकांना बळ देण्यासाठी 'राजे यशवंतराव होळकर महामेष योजना' शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत भ. ज. १. क. प्रवर्गातील लाभार्थींना शेळी, मेंढी पालनासाठी ७५ टक्के अनुदान दिले जाणार आहे. त्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्यात आले असून, २ हजार ५१२ जणांनी नोंदणी केली आहे.राज्यातील भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर आणि तत्सम जमातींच्या उन्नतीसाठी राज्य शासनातर्फे राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेतून मेंढ्यांसाठी चराई, अनुदान, मेंढी, शेळी पालनासाठी जागा खरेदी अनुदान तसेच कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी वसंगोपनासाठी अनुदान दिले जाणार आहे. त्यासाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. मात्र, निवडणुकीची आचारसंहिता लागल्यामुळे ही



प्रक्रिया स्थगित केली होती; परंतु आता आचारसंहिता आटोपल्यानंतर 'राजे यशवंतराव होळकर महामेष योजना' स्थायीआणि स्थलांतरित पद्धतीने मेंढी पालनासाठी पायाभूत सोयी-सुविधांसह २० मेंढ्या व मेंढा नर अशा गटाचे ७५ टक्के अनुदानावर वाटप, सुधारित प्रजातींच्या नर मेंढ्यांचे ७५ टक्के अनुदानावर वाटप, मेंढी पालनासाठी हे अनुदान दिले जाते.

**अर्जाच्या छाननीनंतर प्रक्रिया**

या योजनेच्या माध्यमातून मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून ७५ टक्के अनुदानावर ही योजना राबविली जाते. या योजनेसाठी १२ ते २६ सप्टेंबरपर्यंत पात्र लाभार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागवले होते. जिल्ह्यात २५१२ जणांनी याकरिता अर्ज केले आहेत. या अर्जाची छाननीनंतर निवड प्रक्रिया राबविली जाणार असल्याचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय कावरे यांनी सांगीतले.

**कुणाला मिळते ७५ टक्के अनुदान**

ही योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असून, या योजनेत खालील सहा मुख्य घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. स्थायी व स्थलांतरित मेंढीपालन करणाऱ्या मेंढपाळांना पायाभूत सुविधांसह २० मेंढ्या व १ मेंढा नर अशा मेंढी गटाचे ७५ टक्के अनुदान दिले जाते.

# तर लेटलतीफ कर्मचाऱ्यांची होणार वेतन, सीएल कपात

## जि. प. सीईओंनी दिले खातेप्रमुखांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील वेळा न पाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांनी तसेच आदेश सर्व विभागप्रमुखांना दिले आहेत.




विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या विविध भागांत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी नियमित कार्यालयीन वेळत कर्तव्यावर हजर होणे अपेक्षित असताना वारंवार सूचना दिल्यानंतर यात सुधारणा होत नसल्याने सीईओ संजीता महापात्र यांनी आता लेटलतीफ कर्मचाऱ्यांना इशारा देत यापुढे सलग तीन दिवस उशिरा कार्यालयात आल्यास अशा कर्मचाऱ्यांवर विभागप्रमुखांनी एक दिवसाची वेतन कपात किंवा किरकोळ रजा कपात करण्याचे निर्देश दिले आहेत.

अनेक कर्मचारी कार्यालयीन वेळेत कर्तव्यावर हजर होत नसल्याने सीईओ यांनी गत दोन दिवसांत मुख्यालयातील विविध विभागांत आकस्मिक भेटी दिल्यात वावेळी त्यांना अनेक कर्मचारी कार्यालयात उशिरा येत असल्याची बाब निर्दर्शनास आली. यावेळी त्यांनी विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचे हजेरीपत्रक तपासले. दि. २३ डिसेंबर रोजी सीईओंनी विविध विभागांत भेटी दिल्या असता त्यांना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात ९ कर्मचारी रोजगार हमी योजना विभागात ५, यांत्रिकी उपविभागात ५, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागात ८, वित्त विभागात तब्बल १७ आणि सामान्य प्रशासन विभागात १३ असे ५७ कर्मचारी लेटलतीफ असल्याचे आढळले.

> शासकीय कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर हजरहोण्याची व परत जाण्याच्या वेळा निश्चित करून दिलेल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याने याचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र असे असताना काही कर्मचारी उशिरा येत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे यापुढे सलग तीनवेळा कर्तव्यावर उशिरा आल्यास अशा कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात किंवा सीएल कपात करण्याच्या सूचना विभागप्रमुखांना दिल्या आहेत.
>
> **संजीता महापात्र, सीईओ**

# डॉ. विशाल काळे यांनी बॅडमिंटन स्पर्धेत पटकावले प्रथम पारितोषिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग व नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या वतीने अमरावती जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा मोर्शी येथे २० ते २२ डिसेंबर २०२४ ला संपन्न झाल्या. सदर क्रीडा स्पर्धेत अमरावती मनपामार्फत विविध खेळात व सांस्कृतिक महोत्सवात भाग घेण्यात आला.

अमरावती महानगरपालिकेचे आरोग्य विभाग प्रमुख वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल




काळे यांनीही या स्पर्धेत भाग घेतला व मोर्शी संघाला मेन्स एकेरी व दुहेरी बॅडमिंटनमध्ये हरवून अमरावती महानगरपालिकेने विजेतेपट पटकावले. सदर स्पर्धेत अमरावती महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या आनंद जोशी यांनीही बॅडमिंटन दुहेरीत महत्त्वाची भूमिका बजावली व तेही सह-विजेता ठरलेले आहेत. मोर्शी संघातील राहुल देशमुख यांना पुरुष एकेरीत व श्री देशमुख व श्री फंदे याना पुरुष दुहेरीत हरवून अमरावती महानगरपालिका यांना विजेते पद मिळाले आहे. तसेच इतर स्पर्धेतही अमरावती मनपाला विजेते पद मिळाले आहे. विजयी स्पर्धकांना आमदार चंदु यावलकर, नगर परिषद प्रशासन शाखासह आयुक्त सुमेध अलोणे, मुख्य समन्वय अधिकारी तथामुख्याधिकारी मोर्शी नगर परिषद पराग वानखडे व सर्व नगर परिषदेमधील मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. महानगरपालिकेतील सर्व विजयी खेळाडूंचे लक्ष आता ५ जानेवारी २०२५ पासून सुरू होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धा यवतमाळ साठी लागलेले आहे.

# ओला इलेक्ट्रिकचा संपूर्ण देशभरात ४००० स्टोअर्सचा विस्तार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

भारतातील सर्वात मोठी प्युअर प्ले ईलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) कंपनी असलेल्या ओला इलेक्ट्रिकने संपूर्ण भारतात ४,००० स्टोअरच्या माध्यमातून आपल्या विस्ताराची घोषणा केली. त्यामुळे तिच्या सध्याच्या नेटवर्कमध्ये चार पटींनी वाढ होणार आहे. हे ईव्ही क्षेत्राच्या जगातील काही लक्षणीय विस्तारांपैकी एक असून त्यामुळे देशातील ईव्हीची उपस्थिती, सुलभता आणि



वाढीला मोठी चालना मिळणार आहे. यातून ओला इलेक्ट्रिकने या क्षेत्रातील आपल्या आघाडीला आणखी बळकटी आणली आहे. सर्व्हिस सेंटरसोबत ३२०० नवीन स्टोअर्स सुरू करून कंपनी व्यापक प्रमाणात ईव्हीचा अंगीकार करण्यास चालना देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यामुळे टिअर- १ व टिअर-२ शहरांच्या पलीकडे अगदी भारतभरातील जवळजवळ प्रत्येक शहर व तालुक्यापर्यंत ईव्हीचा प्रवेश होणार आहे. या विस्ताराच्या माध्यमातून ओला इलेक्ट्रिकने सेव्हिंग्जवालास्कूटर या आपल्या अभियानात दिलेल्या वचनाची पूर्तता केली आहे.ओला इलेक्ट्रिकचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक भाविश अगरवाल म्हणाले, आम्ही वचन दिले होते आणि आम्ही आता ते पाळले आहे! आजचा दिवस भारतातील ईव्हीच्या प्रवासातील एक मैलाचा दगड आहे, कारण आम्ही आमचे नेटवर्क प्रत्येक शहर, गाव आणि तालुक्यापर्यंत विस्तारले आहे. आमच्या सर्व्हिस सेंटरसोबत नवीन स्टोअरच्या माध्यमातून आम्ही ईव्हींची खरेदी व मालकीच्या अनुभवाला संपूर्ण नवा आयाम दिला आहे.

# जिल्ह्यात महसुली गावे केव्हा घोषित होणार? गावे विकासापासून वंचित सर्वेक्षण होऊनही सरकारचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील अनेक गावे महसुली गावे घोषित होण्यासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करीत आहेत. आवश्यक सर्व्हेक्षण आणि दस्तऐवज पूर्ण होऊनही शासन स्तरावर अद्याप कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये नाराजी वाढत आहे.

जिल्ह्यातील अनेक आदिवासी व दुर्गम भागांतील गावे महसुली गाव म्हणून घोषित होण्यासाठी पात्र असूनही शासनाकडून दुर्लक्ष होत आहे. महसुली गावे म्हणून मान्यता न मिळाल्याने या गावांना मूलभूत सुविधा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. रस्ते, पाणी, वीज यांसारख्या



सुविधा मिळविण्यासाठी ग्रामस्थांना संघर्षकरावा लागत आहे.सर्व्हेक्षण पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटली. मात्र, अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. महसुली गावे घोषित करण्याच्या प्रक्रियेस उशीर होत असल्याने ग्रामस्थांना शासकीय असूनही शासनाकडून दुर्लक्ष होत आहे. महसुली गावे म्हणून मान्यता न मिळाल्याने या गावांना मूलभूत सुविधा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. रस्ते, पाणी, वीज यांसारख्या सुविधा मिळविण्यासाठी ग्रामस्थांना संघर्षकरावा लागत आहे.सर्व्हेक्षण पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटली. मात्र, अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. महसुली गावे घोषित करण्याच्या प्रक्रियेस उशीर होत असल्याने ग्रामस्थांना शासकीययोजनांचा लाभही मिळत नाही. प्रशासनाने राज्य सरकारकडे वारंवार पाठपुरावा केला असूनही या प्रक्रियेला गती मिळालेली नाही. त्यामुळे शासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक निरीक्षक संघटनेचे हिवाळी अधिवेशन रविवारला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६शेगावं**

महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक निरीक्षक कर्मचारी संघटनेचे राष्ट्रीय हिवाळी अधिवेशन येत्या रविवारी २९/१२/२४ ला सकाळी १०:०० वाजता संत गजानन महाराज पद स्पर्शाने पावन झालेले शेगाव भाष्कर सभागृह, येथे हॉटेल इन चे बाजूला जगदंबा चौक खामगावं रोड येथे पार पडणार आहे. पहिल्याच वर्षातील हे दुसरे अधिवेशन असून पहिले अधिवेशन मार्चमध्ये पार पडले होते. आणि त्या नंतर तीन विभागीय अधिवेशन आणि एक आझाद मैदान मुबंई येथे संघटनेने आंदोलन देखील केले होते. तेव्हा नव्यानेच संघटना स्थापन झालेली होती.परंतु आता हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर आरोग्य सहाय्यक निरीक्षक यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी आणि त्याचा पाठपुरावा करण्यासाठी म्हणून हे संघटनेचे हे हिवाळी अधिवेशन ठेवण्यात आले असल्याचे महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक निरीक्षक संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष धर्मा वानखडे यांनी सांगितले. आरोग्य सहाय्यक निरीक्षक वेतन त्रुटी दूर करणे पदनाम बदल हार्डशीप भत्ता,कायम प्रवास भत्ता अशा अनेक जिव्हाळ्याच्या मागण्या घेऊन हे अधिवेशन करण्याचे योजिले आहे तरी या अधिवेशनाला हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राज्याध्यक्ष धर्मा वानखडे यांचेसह बाजीनाना सूर्यवंशी, अमर तायडे, धनंजय घाटे, विलास निर्गुळे दीपक गाडिलकर, अनिल नाना धोंडगे, प्रशांत अहिरराव,अशोक सोनारकर, धिरेंद्रकुमार, सोमकुवर, मोतीराम चव्हाण, रमेश पागरूत, श्रीमंत भोसले, शरद बडे, मधुकर कासार, विजय चौधरी, प्रल्हाद वानखडे,ज्ञानेश्वर वीर या राज्य पदाधिकारी यांचेसह सर्व जिल्हाध्यक्ष यांनी अधिवेशनाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे केले आहे.

# मुरुमाच्या ओव्हरलोड ट्रकांची तपासणी सुरु

## महसूल विभागाचे भरारी पथक रस्त्यावर , आरटीओ विभागाचे मात्र दुर्लक्ष : विदर्भ प्रजासत्ताकच्या बातमीचा दणका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६बोराळा**

परसापूर रस्त्यावरील खदानी वरून ओव्हरलोड मुरूम भरून धावणारे ट्रकांनी चांगलाच धिंगाणा घातला होता सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक ने हा मुद्दा धरून वृत्त प्रकाशित करताच महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार महसूल विभागाचे भरारी पथक रस्त्यावर आली आहे , बोराळा रस्त्यावरील वन विभागाच्या उद्यानाजवळ महसूल विभागाचा तपासणी नाका लावण्यात आला आहे दोन मंडळ अधिकारी , दोन पटवारी या नाक्यावर कार्यरत करण्यात आले आहे , त्यामुळे खदानी वरून ओव्हरलोड मुरुम भरून धावणारे ट्रक चालक व मालकांमध्ये मध्ये चांगलीच दहशत निर्माण झाली आहे.


**जीव घातक झाले मुरुमाचे ओव्हरलोड ट्रक, हाय स्पीड वाहतूक**
महसूल प्रशासन बेखबर , खदान चालकांनी घातला हैदोस





### ओवरलोड ट्रक विना ताडपत्रीचे

महसूल विभागाने दिलेल्या नियमावली मध्ये ओवरलोड ट्रकांमधून खनिज सांडू नये तथा ओवरलोड मुरूमाची वाहतूक करणाऱ्या ट्रकामुळे उडणाऱ्या धुळ पासून नागरिकांना कोणतीही इजा होऊ नये यासाठी महसूल विभागाने खदान चालकाला परवानगी देताना प्रत्येक वाहतूक करणाऱ्या ट्रकला ताडपत्रीने झाकून वाहतूक करण्याचे आदेश दिले होते परंतु खदान चालक महसूल विभागाने दिलेल्या अटी व शर्तीची ऐशी तैशी करत आहे

बोराळा येथील खदानी वरून येणाऱ्या ट्रकांना थांबवून तपासणी करण्यात येत आहे , खदान चालकाने दिलेली पास वैध की अवैध याचा ऑनलाइन तपास करण्यात येत आहे परंतु खदानी वरून चालणाऱ्या ओवरलोड ट्रकांची कागदपत्रे तपासण्याकरिता आरटीओ विभागाचा भरारी पथक ऑन रोड असणे गरजेचे आहे , बेधडकपणे मुरुम भरून धावणारे ट्रक नागरिकांच्या जीवावर चांगलेच बेतले आहे , शासकीय यंत्रणेने यावर निर्बंध लावणे गरजेचे झाले आहे , आरटीओ व पोलीस विभाग या कडे दुर्लक्ष करीत असून खदान चालक व ट्रक मालक चक्क नियमांची पायमल्ली करून बेधडकपणे ओवरलोड मुरूमाची वाहतूक करीत आहे , आरटीओ व पथ्रोट पोलिसांची खदान चालकासोबत संगणमत तर नाही हा प्रश्न संशयाच्या भवऱ्यात अडकला दिसत आहे

### आरटीओ पोलीस विभागाचे भरारी पथक बेखबर

बोराळा येथील खदानी वरून ओवरलोड मुरूम भरून धावणाऱ्या अधिक तर ट्रकांच्या कागदपत्राची मुदत संपली आहे , बिना इन्शुरन्स , विदाऊट टॅक्स , फिटनेस संबंधित कागदपत्रे मुरुमावर धावणाऱ्या ट्रकांची आरटीओ विभागाने तपासल्यावर मोठ्या प्रमाणात ट्रकांवरती दंड आकारल्या जाऊ शकतो पथ्रोट पोलिसांच्या हद्दीमध्ये बेधडकपणे धावणारे मुरूमांच्या ट्रकांवर पथ्रोट पोलीस आंधळी झाली आहे.

# पोलीस स्टेशन राजापेठ कडुन 'द ब्लु वर्ड' कॅफेवर कार्यवाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर हद्दीतील पोलीस स्टेशन राजापेठ अंतर्गत बुधवारी रवि नगर ते साई नगर रोडवरिल, सातुर्णा येथे हरियाली हॉटेल समोर द ब्लु वर्ड कॅफे वर पोलीस निरीक्षक पुनित कुलट व स्टाफ ने रेड केला असता सदर ठिकाणी काही मुल सार्वजनीक ठिकाणी असभ्यतेचे व अश्लिलतेचे वर्तन करित असतांना दिसुन आले त्यांना पंचा समक्ष ताब्यात घेवुन त्यांना त्याचे नाव गाव विचारले असाता त्यांनी त्याचे नाव १) आशुतोष मुकेश डोंगरे वय २४ वर्ष रा.नवसारी अमरावती २) सागर हरिहर शिंदे वय ३५ वर्ष रा.धानोरा गुरव ता. ना. खडेश्वर जी. अमरावती ३) साहिल दिनेश लांडगे वय २०वर्ष रा. धानोरा गुरव ता. ना. खडेश्वर जी. अमरावती ४) सचिन साहेबराव हिवराळे वय ३० वर्ष रा.राठी नगर अमरावती ५) रोहीत संजयराव गुलालकरि वय २८ वर्ष रा. अंजनगाव वारी, अमरावती असे सागीतले वरुन त्याचे हे कृत्य कलम ११०,११७ म.पो.का प्रमाने होत असल्यामुळे सदरची कार्यवाही करण्यात आली.

सदर कार्यवाही रामनाथ पोकडे, प्रभारी पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनात पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, गणेश शिंदे, सपोआ. राजापेठ विभाग, जयदत् भवर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री, पुनित कुलट, पोलीस उपनिरीक्षक, विकास मनपीया, प्रपोलीस उपनिरीक्षक विपुल हुलावळे, पोहेकाँ. विनोद माहुरे, पोकाँ अमोल खंडेझोड, यांनी सदर कामगीरी केली आहे.

# सावधान, संकेतस्थळावरून लग्न जुळवणे पडू शकते महागात

## हात पिवळे होण्याआधीच खिसा रिकामा: अनोळखीशी संसार कसा करणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

आज घडीला सोशल मीडियावर तरुण मंडळी सक्रिय झाले आहेत. आता अरेंज मॅरेज होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहेत. परंतु अरेंज मॅरेजमुळे थाटलेला संसार सुखी आणि समाधानी होत असतो. प्रेमप्रकरणातून सुरू केलेला संसार किंवा ऑनलाइनमधून झालेल्या मित्रतेला सुखी संसारात वळविण्याचा प्रयत्न केला तरी तो बहुदा अपयशी ठरतो. ऑनलाइनमुळे जोडीदार शोधताना मुलगा किंवा मुलगी ही पैसा, पद, प्रतिष्ठा पाहून जुळत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. पैसा पाहून जवळ येणारी व्यक्ती आपल्याला गंडवून पळून जाईल हे खरे आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, ट्विटरवर दोस्ती करून त्यातून सुखी संसाराचे



स्वप्न कुणी पाहात असेल तर तो व्यक्ती स्वत:ला खड्यात टाकण्याचा प्रयत्न करीत आहे असेच म्हणावे लागेल. लग्न करतांना मध्यस्थीची गरज आहे. त्याशिवाय लग्न कार्य होवू शकत नाही.

**अशी होऊ शकते फसवणूक**

आपल्याशी ऑनलाइन जवळील साधून मित्रता करतील. हळूहळू लग्नाच्या गोष्टी सुरू होतील. समोरच्या व्यक्तीच्या काय आवडी-निवडी माहिती करीत सरळ आपला स्वार्थ साधण्यासाठी श्रीमंत तरुणांच्या नादी लागून त्यांना आपल्या जाळ्यात अडकविण्याचा यशस्वी प्रयत्न करतात.

आपल्या मिळकतीवरून आपल्याशी कुणी लग्न करण्याच्या गोष्टी करीत असेल तर सावध व्हा, तो व्यक्ती आपल्याला पाहून नाही तर आपला पैसा पाहून जवळ येत आहे. तो आपली कधीही फसवणूक करेल. यासाठी आपण सतर्क राहा.

**ही घ्या काळजी**

ऑनलाइनवर जोडीदार शोधताना त्या व्यक्तीला आपण ओळखतो किंवा नाही याची खात्री करा. ज्या व्यक्तीशी मैत्री करतो ती व्यक्ती आपल्या संसारात आपल्याला साथ देईल किंवा नाही याची खात्री करावी. मित्रता करताना आपला व्यवसाय, नोकरी किंवा आपल्याला किती मिळकत आहेत याची शहानिशा करणारा जोडीदार असल्याशी प्रामाणिक राहू शकत नाही. दोस्ती केल्यावर पैशांचा हव्यास असलेली व्यक्ती आपल्यावर प्रेम करणार नाही तर ती आपल्या पैशांवर प्रेम करते, त्यांचा स्वार्थ सिद्ध झाल्यास आपल्याला दूर करतील.

# सावधान! फ्री गिफ्टच्या नादात खाते रिकामे करून बसाल

## आमिषाला बळी पडू नका: सायबर गुन्हेगार होत आहेत सक्रिय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

नाताळ, नववर्षाच्या पार्श्वभूमीवर सायबर लुटारूकडून फ्री गिफ्टचे आमिष दाखवून फसवणुकीच्या घटनांसह, पेटीएम, फोन पे, गुगल पे यांसारख्या बनावट ॲपद्वारेही फसवणुकीचा धंदा सुरू केला आहे. काही ठिकाणी असे प्रकार होत असल्याने बनावट ॲप व सायबर गुन्हेगारांपासून सावध राहण्याचे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात येत आहे.



सायबर पोलिसांकडे ऑनलाइन फसवणुकीच्या वेगवेगळ्या तक्रारी येत असतात. यात आर्थिक फसवणूक झाल्यानंतर पोलिस ठाण्यांपर्यंत येणारे अनेक जण असतात. त्यात सण-उत्सव काळात सायबर गुन्हेगार अधिक सक्रिय होत असतात. त्यात आता नाताळ, थर्टी फर्स्ट आणि नववर्षानिमित्ताने सोशल मीडियावर विविध ऑफरसह फ्री गिफ्टचे आमिष दाखवून फसवणकीच्या घटना वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे अशा कुठल्याही आमिषाला बळी न पडता अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, असा सल्ला पोलिसांकडून दिला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी कुठल्याही आमीषाला बळी न पडता सजग राहणे गरजेचे आहे.

**तपशील बदलता येतो**

गुगलवरील तपशील अचूक असण्यासाठी गुगलने सजेस्ट ॲन एडिट हा पर्याय दिला व त्याद्वारे तपशील बदलता येतो. ऑनलाइन ठगांनी सजेस्ट ॲन एडिटचा हा पर्याय वापरून संकेतस्थळावरील अधिकृत संपर्क बदलून स्वत:चा मोबाइल क्रमांक गुगलवर देण्यास सुरुवात केली आहे. समोरून बोलणारी व्यक्ती बँक, ग्राहक सेवा केंद्रातील अधिकारी असे भासवून नागरिकांकडे बँकेने कार्ड ब्लॉक केल्याची भीती घालून डेबिट-क्रेडिट कार्डाची माहिती घेतात. त्याआधारे ठग संबंधितांच्या खात्यातून परस्पर पैसे काढतात.

**वाचू शकतात पैसे**

फसवणुकीमध्ये तीन टप्प्यांत काम चालते. फसवणुकीची रक्कम खात्यात जमा होताच त्याच वेळेस दुसरीकडे काढण्यास सुरुवात होते, तर काही प्रकरणात विविध शॉपिंग संकेतस्थळावर खरेदीसाठी पैसे अडकवले जात असल्याचे दिसते.अनेकदा पैसे काढण्यासाठी असलेली मर्यादा, ऑनलाइन ट्रान्सफर प्रक्रियेमुळे पैसे काढण्यास वेळ जातो. यापूर्वीच तक्रारदार पोलिस ठाण्यात आल्यास तत्काळ तांत्रिक पुराव्याच्या मदतीने संबंधित बँकेशी संपर्क साधून पैसे वाचविण्यास मदत होते.

**लिंक डाऊनलोड करु नका**

प्रत्यक्षात सेवा पदरी पाडून घेण्यासाठी लिंक डाऊनलोड करण्याचे आवाहन केले जाते. ही लिंक डाऊनलोड केल्यास भ्रमणध्वनी, संगणकाचा ताबा घेऊन त्यातील संवेदनशील माहिती भामटे मिळवितात. त्याआधारे आर्थिक फसवणूक, माहितीची चोरी, बदनामी किंवा अन्य गुन्हे घडू शकतात त्यामुळे नागरिकांनी अधिक सतर्क रहावे. अशी माहिती सायबर पोलीसांनी दिली.

# सातबारा, पेरेपत्रक नसल्याने क्विंटलमागे पाचशे रुपयांचे नुकसान

## कापूस उत्पादकांना फटका: पणन महासंघाच्या अटीने वाढविली अडचण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघाकडून कापूस उत्पादकांना नोंदणीकरिता सन २०२४- २५ चे पेरेपत्रक असलेला अद्ययावत सातबारा अनिवार्य करण्यात आला आहे. परंतु, या अटीमुळे शेतकऱ्यांची चांगलीच अडचण झाली आहे. बहुतांश शेतकऱ्यांच्या सातबारावर २०२१ पासून पेरेपत्रक नोंद नसल्यामुळे पणन महासंघ कापूस घेण्यास नकार देते. परिणामी, शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांना कापूस विकावा लागत असल्याने क्विंटलमागे ५०० रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.



सातबारावरील पैरेपत्रक नोंदणीमधील समज, गैरसमजामुळे चुकीच्या माध्यमामुळे अनेक शेतकरी हरभरा व गहू या पिकांचा विमा काढण्यापासून सुद्धा वंचित राहिले आहे.पेरेपत्रक नोंद केल्याशिवाय पीक विमा निघत नाही, अशा अफवांमुळे हरभरा व गहू या पिकांचा मुदतीत शेतकरी पीक विमा काढू शकले नाही.ई-पीक पाहणी यंत्रणेमार्फत पेरेपत्रकनोंदणी करण्याचा शासनाचा अट्टाहास म्हणजे जाणीवपूर्वक शेतकऱ्याला अडचणीत टाकण्याचा शासनाचा उपद्व्याप आहे.नोंदणी करण्याचा शासनाचा अट्टाहास म्हणजे जाणीवपूर्वक शेतकऱ्याला अडचणीत टाकण्याचा शासनाचा उपद्व्याप आहे.ई-पीक सारख्या प्रयोगाकरिता सद्यःस्थितीत ग्रामीण शेतकरी तयार झालेला नाही. वारंवार मागणी करूनही त्याच्या समस्येचे निवारण न करता आणखी त्याला अडचणीत टाकण्याचे काम शासनामार्फत केले जात आहे. सातबारा अद्ययावत ठेवणे हे महसूल विभागाच्या नियंत्रणातील काम असून, सातबारातील पेरेपत्रकच्या नोंदी महसूल विभागमार्फतच नोंदविणे गरजेचे आहे.त्यामुळे त्यांनीच या कामाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

> वारंवार मागणी करूनही शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून, ही वृत्ती चेतकऱ्यांना आर्थिक अडचणीत भाणणारी आहे. शेतकऱ्यांच्या अडचणीचे गांभीर्य लक्षात घेऊन पेरेपत्रक नोंदविण्याकरिता शेतकऱ्याला जबाबदार न धरता कायमस्वरूपी शासनाने मार्ग काढावा.
>
> **प्रकाश साबळे शेतकरी**

# रबी हंगामातील ई-पीक पाहणीसाठी मिळाली मुदतवाढ : ॲपमध्ये तांत्रिक दुरुस्ती : १५ जानेवारीपर्यंत अंतिम मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

रब्बी हंगामासाठी १ डिसेंबरपासूनराज्यात ई-पीक पाहणी सुरू झाली आहे. १५ आनेवारीपर्यंत ई-पीक पाहणी नोंदणी करता येणार आहे. यासाठी शासनाने पूर्वीच्या ॲपमध्ये काही तांत्रिक दुरुस्ती करून नवीन रूपात डिजिटल क्रॉप सर्व्हे डीसीएस हे पाहणी ॲप उपलब्ध करून दिले आहे. पीकविमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपती एमएसपीअंतर्गत पिकांची नोंद व उत्पादनानंतर हमीभावात विक्री आदी सुविधांचा लाभ घेण्यासाठी पीक पाहणी अँपमध्ये नोंद असणे गरजेचे आहे. पीक पाहणीसाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटर आतील पिकांची दोन छायाचित्रे घेणे आवश्यक केले आहे.

केंद्र सरकारच्या धोरणानुसार आता याॲपमध्ये काही तांत्रिक सुधारणा केल्या असून, नवीन ॲपच्या माध्यमातून ई-पीक पाहणी होणार आहे. यापूर्वी कुठेही बसून कोणत्याही क्षेत्राची पीक पाहणी करता येत होती. मात्र, नवीन आलेल्या ॲपमध्ये प्रत्यक्ष संबंधित शेती गटात



जाऊनच पिकांची पाहणी करता येत असल्याने खोटी व चुकीची पाहणी आता करता येणार नाही.

शेतकऱ्यांना स्वतः पिकाची नोंदणी ई-पीकपाहणी मोबाइल ॲपद्वारे नोंदवायची आहे. ई-पीक पाहणी नोंदणी करणाऱ्यांनाच राज्य व केंद्र सरकारच्या शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपली ई-पीक पाहणी करण्याची अंतिम मुदत १५ जानेवारीपर्यंत आहे. शेतकऱ्यांनी पिकांची नोंद घेताना चुकीची नोंद झाली असल्यास स्वतः शेतकऱ्यांना ४८ तासांत दुरुस्ती करता येऊ शकते. शेतकरीस्तरावरील ई-पीक पाहणीकरण्यासाठी १ डिसेंबर ते १५ जानेवारी ही मुदत आहे.सहायकस्तरावर ई-पीक पाहणीसाठी १६ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ ही मुदत आहे. शेतकरीस्तरावरून मोबाइल ॲपद्वारे ई-पाहणी नोंद करण्यात येऊन शेतकरीस्तरावरील कालावधी संपल्यानंतर सहायकांमार्फत उर्वरित शेतकऱ्यांची पीक पाहणी ॲपद्वारे नोंदविण्यात येते.

**शेतकऱ्यांना जिओ फेन्सिंग केले बंधनकारक**

डिजिटल क्रॉप सर्व्हे डीसीएसमध्ये गटाच्या हद्दीवर आधारित जिओ फेन्सिंग बंधनकारक करण्यात आले आहे. जोपर्यंत संबंधित खातेदार सहायक निवडलेल्या गटात जाऊन पीक पाहणी करत नाहीत, तोपर्यंत पिकांचे छायाचित्र काढता येत नाही. पीक पाहणी अपलोड करता येत नाही. तसेच मोबाइलमध्ये जिओ फेन्सिंग असल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या गटात जाणे अनिवार्य आहे.